# नवी मुंबई महानगरपालिका
# एकात्मिक आरोग्य कुटूंब कल्याण सोसायटी
# राष्ट्रीय शहरी आरोग्य अभियान

15 व्या वित्त आयोगांतर्गत शहरी आरोग्य वर्धिनी केंद्राकरीता रिक्त असलेल्या पदांची भरती प्रक्रिया खालील तक्त्यात दर्शविल्याप्रमाणे निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात प्रतिमहा ठोक मानधन तत्वावर कंत्राटी पध्दतीने करावयाची आहे. बहुउद्देशीय कर्मचारी (पुरुष) पदाकरीता इच्छुक व पात्र उमेदवारांनी विहित नमुन्यात अर्ज आरोग्य विभाग, 3 रा मजला, नमुंमपा मुख्यालय, प्लॉट नं.1, से.15 अे, किल्लेगावठाण जवळ, सी.बी.डी बेलापूर, नवी मुंबई 400614 येथे दि.10/10/2025 ते दि.30/10/2025 पर्यंत सादर करावे.

| पदनाम | अर्हता | वय मर्यादा (वर्ष) | मासिक ठोक मानधन | प्रवर्ग |
|---|---|---|---|---|
| बहुउद्देशीय कर्मचारी (पुरुष) MPW (Male) | • 12 वी विज्ञान शाखेत पास + पॅरामेडिकल मूलभुत प्रशिक्षण अभ्यासक्रम किवा स्वच्छता निरीक्षक अभ्यासक्रम | अराखीव प्रवर्ग - 38<br>राखीव प्रवर्ग - 43 | 18,000/- | अ.जा. - 3, अ.ज. -2, वि.जा. (अ) -1, भ.ज. (क) -2, भ.ज. (ड)-1, इमाव - 8, साशैमाप्र - 6, आदुघ -6, खुला -11<br>**एकूण - 40** |

**15 व्या वित्त आयोगांतर्गत शहरी आरोग्य वर्धिनी केंद्राकरीता नवी मुंबई महानगरपालिके अंतर्गत रिक्त पदभरतीच्या अनुषंगाने मार्गदर्शक सुचना खालील प्रमाणे.**

15 व्या वित्त आयोगांतर्गत शहरी आरोग्य वर्धिनी केंद्राकरीता प्रकल्प अंमलबजावणी आराखडयानुसार मंजूर पदांपैकी रिक्त पदे भरण्याकरीता जाहिरात https://www.nmmc.gov.in या संकेत स्थळावर प्रसिध्द करण्यात येत असून अर्ज करावयाच्या पध्दतीबाबत सर्वसाधरण सुचना/माहिती खालील प्रमाणे देण्यात येत आहे.

सर्व सूचनांचे काळजी पूर्वक वाचन करुन अर्ज विहित केलेल्या पध्दतीनुसारच अर्ज सादर करावा. अर्जामध्ये दिलेल्या नमुद माहितीच्या आधारे व सादर केलेल्या प्रमाणपत्रांच्या/कागदपत्रांच्या आधारे उमेदवार पात्र व अपात्र ठरविण्यात येईल. व त्या आधारे त्याचा समावेश पुढील निवड प्रक्रियेत करण्यात येईल.

अर्ज स्वीकारण्यात आला किंवा पुढील निवड प्रक्रियेत समावेश करण्यात आला म्हणजे उमेदवाराची निवड झाली असा होणार नाही. निवड प्रक्रिये दरम्यान कोणत्याही वेळी किंवा उमेदवाराच्या निवडी नंतर अर्जदार विहित अर्हता धारण करीत नसल्याने किंवा कोणत्याही कारणास्तव अपात्र ठरत असल्याचे निदर्शनास आल्यास अशा उमदेवाराची/निवड तात्काळ रद्द करण्यात येईल.

**क) अर्ज करावयाच्या अनुषंगाने सुचना -**

1) उपरोक्त पदे ही कंत्राटी स्वरुपाची असून नियुक्ती 6 महिन्यांच्या कालावधी करीता राहील.

2) सर्व उमेदवारांनी जाहिरात मध्ये नमुद अर्जा मध्ये अर्ज विहित कालावधीत भरणे आवश्यक आहे.

3) अर्जात दिलेल्या प्रत्येक मुद्दयाची माहिती अचूक भरावी. एकदा भरलेली माहिती अंतिम समजण्यात येईल व त्यात कोणताही बदल करता येणार नाही याची नोंद घ्यावी.

9. सध्याचा पासपोर्ट आकाराचा फोटो
10. लहान कुटूंबाचे प्रमाणपत्र (प्रतिज्ञापत्र)
11. फौजदारी गुन्हा दाखल नसल्याचे हमी पत्र

वैद्यकीय आरोग्य अधिकारी तथा सदस्य सचिव
एकात्मिक आरोग्य कुटूंब कल्याण सोसायटी
नवी मुंबई महानगरपालिका